# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य २०२१/डीबीटी/ 10775 दि.०१.१०.२०२१

**तात्काळ ईमेलद्वारा**

0 1 OCT 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू शिष्यवृत्ती योजनांसाठी सन २०१९-२० करीता ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहेत, तथापि त्रृटीपूर्ततेसाठी सदरहू अर्ज विद्यार्थ्यांना त्यांचे लॉगीनवर परत पाठविलेले आहेत, अशा अर्जांचे Re-Apply करणेसाठी दि. २०.१०.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी दि. २०.१०.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था/ विद्यापीठ यांचेमार्फत कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांनी भरलेले शिष्यवृत्ती अर्ज संस्था तसेच विभाग स्तरावरुन दररोज निकाली काढणे आवश्यक आहे, कोणत्याही परिस्थितीत संस्था तसेच विभाग स्तरावर अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत. प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्‌भवणाऱ्या बाबीस संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. इन्स्टियुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होत नाही.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीद्वारे आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यात येतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे बँक खातेशी आधार संलग्न नाही अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी त्वरीत बँक खातेशी आधार संलग्न करावे.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner

Email: Inbox (1597) | Aaple Sarkar DBT

mahadbtmahait.gov.in/Home/Index

Apps | Home - National Sc... | Email: Inbox (1140) | Inbox (8) - scholars... | https://mahadbtma... | BEAMS :: Budget Es... | Bill Portal | महाराष्ट्र शासन सार्व... | Home | Commissio... | Reading list

Skip To Main Content | Skip To Navigation

Home | A+ | A= | A- | मराठी

आपले सरकार महाDBT

Shri Uddhav Thackeray
Hon'ble Chief Minister
Maharashtra State

How to Apply Online ? | Benefit Schemes | Post Matric Scholarship | Pre Matric Scholarship | Pension Schemes | Farmer Schemes | Labour Schemes | Special Assistance Schemes

to 20th Oct 2021. Last date for Application Re-Apply of A.Y. 19-20 is 20th Oct 2021.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बैंक | India Post Payments Bank

Guidelines for Aadhaar linking to bank account

Guidelines on Benefit Disbursement

Notice

Attention!!!

- Application Acceptance (New/Renewal) for A.Y.20-21 has been Extended to 20th Oct 2021.
- Last date for Application Re-Apply of A.Y. 19-20 is 20th Oct 2021.
- Guidelines and Rules of procedure for application submission. Please read carefully.

Guidelines and Rules

Welcome to Aaple Sarkar DBT Portal
Unprecedented expansion of direct benefits to the deprived and deserving

आपले सरकार DBT

All Schemes

- Social Justice and Special Assistance Department +
- Tribal Development Department +
- Directorate of Higher Education +
- Directorate of Technical Education +
- School Education and Sports Department +
- OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department +
- Directorate of Medical Education and Research +
- Minority Development Department +

Join MAHADBT Group on Microsoft Kaizala

New Applicant Registration

Applicant Login

Institute / Dept / DDO Login

Grievance / Suggestions

User Manuals

- Help file for Online Application Process
- Pop Up Blocker Guidance
- Forgot Password
- Forgot Username
- Aadhaar seeding with NPCI mapping form New
- Check for Bank Aadhaar Mapping Process New

Type here to search | 31°C | ENG IN | 3:02 PM 10/1/2021

Scanned with CamScanner